निवडक



केरी : सम्राट क्लब केरीच्या परिवाराण दिन कार्यक्रमप्रसंगी वृक्षारोपण करताना दीपक नार्वेकर व इतर.

## सम्राट क्लब केरीतर्फे पर्यावरण दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १५ :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सम्राट क्लब केरीतर्फे घोटेली नं १ केरी–सत्तरी येथे पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ.राम गावस यांच्या घराजवळ वृक्षारोपण करून झाडे वितरीत करण्याचा कार्यक्रम झाला.

गोवा पर्यटन विकास महामंडळाचे उपसरव्यवस्थापक दिपक नार्वेकर, समाट क्लब केरीचे अध्यक्ष संजय गावकर, माशेल सम्राट क्लबचे अध्यक्ष मंगेश गावकर, नंदा माजीक, देविदास गावस, अर्जुन गावस, भैरु झोरे, डॉ. संदेश गावस, यशवंत गावस, रणजीत पाटील, रुपेश गावस, सरीता माजिक, अस्मीता राणे पांगम, क्रीशा मयेकर, उषा नार्वेकर आदी मान्यवर उपस्थित होते. पर्यावरणाचा सांभाळ करा तसेच झाडे लावण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

पर्यावरण जागृती विषयक विविध उपक्रम सम्राट क्लब केरीतर्फे दरवर्षी राबविले जातात.पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केरी परिसरात विविध ठिकाणी वृक्षारोपण तसेच झाडे वितरीत केली जातात. संजय गावकर यांनी यावेळी स्वागत व प्रास्ताविक केले. भैरु झोरे यांनी आभार मानले.

## वेळगे गावच्या विकासात महत्त्वाची भूमिका कार्यकर्त्यांनी बजावली : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश प्रथम धर्तीवर संपूर्ण देशात आणि गोव्यात भारतीय जनता पक्षाने काम सुरू केले आहे. विकासित भारत २०४७चा आमचा संकल्प आहे. देशात आणि गोव्यातही पक्ष पुढारी, कार्यकर्ते चांगले कार्य करत आहे. कार्यकर्ता हा पक्षाचा शिलेदार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी वेळगे येथे केले.

वेळगेच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असून २०१२ नंतरचा वेळगेगाव पाहा या परिसरात झालेला विकास हा मी केला अस मी म्हणणार नाही. यासाठी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते, त्यांची मेहनत आहे. आपला वेळगे गावचा प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा शिलेदार आहे. तुम्ही दिलेले प्रेम या पुढेही राहूदे, असे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत वेळगे ग्रामपंचायत सभागृहात झालेल्या मंडळ संकल्प सभेत सांगितले.

यावेळी जिल्हा पंचायत सदस्य गोपाळ सुर्लकर, साखळी मंडळ अध्यक्ष रामा नाईक, सरपंच सपना पार्सेकर, उपसरपंच सर्वेश मुळगावकर, सर्वेश घाडी, स्वेता गावकर, सामंता कामत, योगिता हळदणकर, ज्येष्ठ कार्यकर्ते शांबा गावकर, संजय नाईक, बुथ अध्यक्ष मुकेश घाटवळ, आदित्य पेडणेकर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

दीपप्रज्वलन करून कार्यक्रमची सुरवात झाली. स्वागत रामा नाईक यांनी केले. गोपाळ सुर्लकर, सपना पार्सेकर यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसचालन वासू गावकर यांनी केले.

मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी मतदाराशी संवाद साधला. शनिवारी संध्याकाळी मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी बूथ चलो अभियान अंतर्गत गावातील उपस्थित मतदारांशी खाजगी रित्या संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. वेळगे ग्रामपंचायत कार्यालयात कार्यक्रमास मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. नागरिकांनीही आपल्या विविध समस्या मुख्यमत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या समोर कथन केल्या. या सोडवण्याची खात्री काहींना दिली. आपण नेहमीच लोकांन सोबत आहे. तुम्ही आपली माणस आहे. तेव्हा नी संकोच आपल्याकडे या मी पूर्ण सहकार्य देणार आहे, असे ही मुख्यमंत्री मतदारांना म्हणाले.

## नर्सवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी डॉक्टरचा जामीन अर्ज स्थगित

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १५ :** कुंकळ्ळी मधील एका खाजगी क्लिनिकमध्ये काम करणाऱ्या नर्सवर कथित लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या डॉ. सॅम्युअल अरवातिगी यांचा जामीन अर्ज दक्षिण गोवा सत्र न्यायालयाने स्थगित केला असून, याबाबत पुढील सुनावणी १६ जून रोजी होणार आहे. न्यायालयाने कुंकळ्ळी पोलिस, बचाव पक्षाचे वकील आणि सरकारी वकील यांना नोटीस बजावली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित परिचारिका काही वर्षांपासून सासष्टी मधील एकाच क्लिनिक व डायग्नोस्टिक सेंटरमध्ये काम करत होती. २२ एप्रिलच्या रात्री, डॉ. अरवातिगी यांनी उपचाराच्या बहाण्याने तिला त्यांच्या बाणावली निवासस्थानी बोलावले आणि तिथे तिच्या संमतीशिवाय लैंगिक अत्याचार केला, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तक्रार पीडितेच्या आईने २५ एप्रिल रोजी कुंकळ्ळी पोलिस ठाण्यात दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी भारतीय न्यायसंहिता अंतर्गत गुन्हा नोंदवून डॉक्टरला अटक केली.

या प्रकरणाच्या चौकशीसाठी फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी भेट दिली, आणि फिंगरप्रिंट तसेच इतर शारीरिक पुरावे गोळा केले. क्लिनिकमधील इतर कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली असून, त्यांचे जबाब अधिकृतरीत्या नोंदवले गेले आहेत. दरम्यान, पीडितेची वैद्यकीय तपासणी गोवा मेडिकल कॉलेज येथेकरण्यात आली असून, अहवालाची प्रतीक्षा आहे.

## डिचोली तालुक्यात मुसळधार

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** डिचोली तालुक्यात रविवारी मुसळधार पावसाने झोडपल्याने जनजीवन विस्कळीत झाले अनेक ठिकाणी पडझड झाली असून डिचोली अग्निशामक दलाचे जवान मदत कार्यास गुंतल्याचे दिसून आले.

वीज खांब तसेच वृक्ष कोसळून काही प्रमाणात हानी झालेली आहे. डिचोली तालुक्यात अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचण्याचे प्रकार दिसून आले डिचोली शहर साखळी वेळगे आधी विविध भागात रस्त्यावर पाणी साचल्याचे दिसून आले मे महिन्यात पावसाने झोडपल्याने मान्सूनपूर्वक कामे अडकली त्यामुळे अनेक ठिकाणी अजूनही काही प्रमाणात मान्सून पूर्व कामाचा सपाटा चालू असला तरी मुसळधार पावसामुळे व्यक्तय आला असून त्याचा परिणाम लोकांना सहन करावा लागत आहे. वेळगे येथे वीज खांब पडून हानी झाली अनेक ठिकाणी कामे सुरू असल्याने रस्त्यावर चिखल झाला असून त्याचा त्रास लोकांना सहन करावा लागत आहे. आमदार डॉ. चंद्रकांत शेटये यांनी डिचोलीतील कामाचा नुकताच आढावा घेतला, ज्या ठिकाणी अजूनही काम करणे बाकी आहे, त्याबाबत आदेश दिलेले आहेत. गटारे तसेच वेगवेगळ्या ठिकाणी सचणारे पाणी याबाबत तातडीने उपयोजन करण्याचे आदेश दिले आहे.

साखळीत अनेक ठिकाणी पाण्यावर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्याची माहिती नगराध्यक्ष सिद्धी प्रभू यांनी दिली. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी तालुक्यातील आपत्कालीन नियंत्रण कक्ष सज्ज ठेवण्याचे आदेश दिलेले असून तातडीने उपाययोजना करताना सर्व पंचायत विभागात संपर्क ठेवण्याचा सूचना दिलेल्या आहेत. पावसाचा जोर वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन आपत्कालीन नियंत्रणा सजग झाली आहे.

# कातकऱ्यांना मिळाले वीजेनंतर पाणी

### नळाद्वारे पाणी पोहोचल्याने मोठा दिलासा : पायाभूत सुविधांमुळे दैनंदिन जीवनात सुधारणा

■ टीम दैनिक हेराल्ड




**फोंडा, दि. १५ :** फोंड्याच्या निरंकाळ पठारावर वास्तव्यास असलेल्या कातकरी जमातीसाठी आयुष्य आता अधिक सुलभ होत आहे. काही महिन्यांपूर्वी वीज जोडणी झाल्यानंतर, आता त्यांच्या झोपड्यांपर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या पायाभूत सुविधांमुळे या समुदायाच्या दैनंदिन जीवनात लक्षणीय सुधारणा झाली आहे. याआधी या जमातीच्या महिलांना जवळपास २०० मीटर पेक्षा जास्त अंतरावर असलेल्या टाकीतून खडकाळ भाग ओलांडत पाणी आणावे लागत होते, विशेषतः रात्रीच्यावेळी हा प्रवास अधिक धोकादायक ठरत असे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन ह्यूमन टच फाउंडेशन आणि हँड्स ऑफ होप फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थांनी सरकारच्या सहकार्याने झोपड्यांच्या परिसरात पाण्याची टाकी बसवली. या टाकीच्या माध्यमातून आता घरोघरी पाणी पुरवठा होतो आहे. आदिवासी नेते गोपाळ पवारयांनी सरकार आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गेल्या वर्षी वीज विभागाने आमच्या झोपड्यांमध्ये वीज पोहोचवली. आता पाणीही दारापर्यंत आले आहे. आमचा आनंद खरोखरच द्विगुणित झाला आहे, असे ते म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आम्हाला आता पक्की घरे हवी आहेत आणि आमच्या मुलांना चांगले शिक्षण व आरोग्य सेवा मिळावी, हेच आमचे पुढचे स्वप्न आहे. मूळ महाराष्ट्रातील या भटक्या जमातीचे नाव २०१६ साली चर्चेत आले, जेव्हा अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या १३ झोपड्या उद्ध्वस्त केल्या. त्या घटनेनंतर या समुदायाला विविध स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांनी आधार दिला. मानवाधिकार आयोगाने याची दखल घेत सरकारला त्यांना मूलभूत सेवा पुरवण्याचे निर्देश दिले होते. त्या पार्श्वभूमीवर सुरुवात झाली आणि हळूहळू वीज, पाणी, आरोग्य आणि ओळखपत्रांच्या स्वरूपात सुविधा पोहोचू लागल्या.

सध्या या समुदायाची लोकसंख्या सुमारे ११५ असून, त्यामध्ये ५० मुले आहेत. यामध्ये २३ मुले प्राथमिक शाळेत, १३ हायस्कूलमध्ये, तर ९ बालवाडीत शिक्षण घेत आहेत. पुरुष आणि महिला दोघेही रोजंदारीवर काम करत आहेत. सरकारी व स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नातून ३५ सदस्यांना मतदार ओळखपत्र व रेशनकार्ड मिळाले आहेत. आरोग्य व स्वच्छतेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी नियमित आरोग्य शिबिरांचे आयोजनही सुरू झाले आहे.

# काणकोण औद्योगिक वसाहतीतील धोकादायक टाकीचे ड्रोन सर्वेक्षण

■ टीम दैनिक हेराल्ड



**काणकोण, दि. १५ :** श्रीस्थळ येथील काणकोण औद्योगिक वसाहतीत २० वर्षांपूर्वी बंद पडलेल्या अल्कोहोल कारखान्यातील एक मोलॅसेस (मळी) साठवण टाकी धोकादायक स्थितीत झुकलेली आढळल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संभाव्य पर्यावरणीय आपत्ती टाळण्यासाठी ड्रोन चित्रीकरण आणि स्ट्रक्चरल स्थिरता चाचणीसह तातडीच्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

गुरुवारी सकाळपासून परिसरात 'मळी'चा तीव्र वास जाणवू लागल्याने स्थानिकांत चिंता वाढली. झुकलेली टाकी फुटल्यास साठवलेला काळा सडलेला पदार्थ शेजारच्या औद्योगिक भूखंडात आणि नंतर तळपण नदीमार्गे समुद्रात पोहोचू शकतो, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. यावेळी काणकोणचे उपजिल्हाधिकारी प्रतापराव गावकर, मामलतदार, आयडीसी आणि गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी, तसेच स्थानिक आमदार रमेश तवडकर यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. एनटीएस प्रायव्हेट लिमिटेड या नवीन लीजधारक कंपनीकडून शुक्रवारी टाकीचे ड्रोनद्वारे चित्रीकरण करण्यात आले. स्ट्रक्चरल स्थिरता चाचणीही सध्या सुरू आहे. या सर्वेक्षणाचे निष्कर्ष तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे प्रमुख असलेल्या उपजिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहेत. सभापती रमेश तवडकर यांनी स्पष्टपणे सांगितले की, तातडीने टाकीचे चित्रीकरण आणि स्थिरता चाचणी घेण्याचे आदेश दिले असून, टाकीतील शिल्लक मळी तत्काळ काढून टाकावी, असा आदेशही देण्यात आला आहे.

उक्त औद्योगिक भूखंड पूर्वी सिद्धी मल्टी–ट्रेड प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे होता. त्यांनी सुमारे ७०० टन मोलॅसेस आधीच काढून टाकल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. उर्वरित साठा सध्या एनटीएस प्रायव्हेट लिमिटेड या नवीन लीजधारकाच्या ताब्यात असून त्यांनी उरलेले मोलॅसेस सुरक्षितपणे हलवण्याची तयारी दर्शवली आहे. ३ जून रोजी आयडीसीने पूर्वीच्या लीजधारकांना उर्वरित मोलॅसेस त्वरित काढून टाकण्याचे पत्र पाठवले होते. अवघ्या काही दिवसांतच भूखंडाचे मालकी हक्क एनटीएसकडे हस्तांतरित झाले.स्थानिक रहिवाशांच्या मते, टाकी फुटली तर उरलेली मोलॅसेस जवळच्या रस्त्यांवरून व शेजारच्या वसाहतींमधून वाहत जाऊ शकते.

## दक्षिण गोव्यात ३० कोमुनिदाद संस्थांना 'निष्क्रीय' म्हणून नोटीस

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ २४ जून पर्यंत मागवले स्पष्टीकरण

▶ संरक्षक नियुक्तीची शक्यता

**मडगाव, दि. १५ :** दक्षिण गोवा विभागातील एकूण ९० कम्युनिडेड संस्थांपैकी सुमारे ३० संस्थांनी २०२५–२०२७ या त्रैवार्षिक कालावधीसाठी नियोजित निवडणुका कोरमअभावी आयोजित केल्या नाहीत. त्यामुळे या संस्थांना निष्क्रीय ' म्हणून घोषित करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दक्षिण गोवा कोमुनिदाद प्रशासक अभिजीत निकम यांनी संबंधित ३० संस्थांना कारणे विचारण्याची नोटीस बजावली असून, त्यांना निष्क्रीय ' म्हणून घोषित का करू नये, याबाबत २४ जून २०२५ पर्यंत लेखी हरकती आणि प्रतिनिधित्व सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

या संस्थांना 'डिफंक्ट' घोषित केल्यानंतर त्यांची नावे अधिकृत सरकारी राजपत्रात प्रसिद्ध केली जातील. त्यामुळे सरकारला पुढील प्रशासकीय कारवाई विशेषतः संरक्षक नियुक्ती करण्याचा मार्ग मोकळा होईल. प्रशासकीय अहवालानुसार, अपात्र ठरलेल्या ३० संस्थांपैकी २० संस्था सासष्टी तालुक्यातील आहेत. उर्वरित सहा संस्था मुरगाव मध्ये असून, चार संस्था सांगे, केपे व इतर तालुक्यांमध्ये आहेत.

प्रशासकांनी दिलेल्या नोटिसांनुसार, संबंधित संस्थांच्या भागधारकांना २४ जूनपर्यंत त्यांच्या हरकती प्रशासक कार्यालयात सादर कराव्या लागतील. त्यानंतर, वैयक्तिक सुनावणीस इच्छुक भागधारकांना १ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता प्रत्यक्ष किंवा अधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

प्रशासकांनी स्पष्ट केले आहे की, दिलेल्या मुदतीत हरकती न दिल्यास किंवा सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास, संबंधित संस्थांविरुद्ध त्यांच्या अनुपस्थितीत निर्णय घेण्यात येईल. या कारवाईसाठी कोमुनिदाद संहितेच्या कलम १८१–अ (१) चा आधार घेतला आहे. या कलमानुसार, जर कोरमाच्या अभावामुळे एखादी परिषद निवडणूक घेण्यास असमर्थ ठरली, तर प्रशासक चौकशीनंतर ती संस्था 'डीफंक्ट' म्हणून घोषित करू शकतो. सदर निवडणुकीसाठीचा कालावधी ८ डिसेंबर २०२४ ते १९ जानेवारी २०२५ असा निश्चित करण्यात आला होता.

मात्र, नियमानुसार झालेल्या बैठका व पीठासीन अधिकाऱ्यांच्या अहवालांनुसार, या ३० संस्थांमध्ये योग्य कोरम न झाल्यामुळे निवडणूक प्रक्रिया अपूर्ण राहिली. डिफंक्ट घोषित झालेल्या संस्थांवर संरक्षक नियुक्त केला जाऊ शकतो का, यावर आता सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे. काही भागधारकांनी याबाबत चिंता व्यक्त केली असून, संरक्षक म्हणून मामलतदार किंवा सह–मामलतदाराची नियुक्ती होणार का यावर ते बोटे ओलांडून वाट पाहत आहेत.

संहितेच्या कलम १८१–अ (४) व (५) नुसार, प्रशासकाचा आदेश आणि अपील प्रक्रियेनंतर सरकार संबंधित मंडळावर संरक्षक नेमू शकते. हा संरक्षक संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सर्व अधिकार वापरेल आणि कार्ये पार पाडेल. तसेच, संरक्षकाच्या निर्णयाविरोधात संस्थेचा कोणताही घटक संबंधित प्रशासकाकडे अपील करू शकतो आणि अशा अपीलवर कोमुनिदाद संहितेतील सर्व लागू तरतुदींचे पालन केले जाईल.

# आगशी मध्ये विषारी कचऱ्याचा शेतीवर परिणाम

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १५ :** २३ मे रोजी झालेल्या हंगामातील पहिल्या मुसळधार पावसापासून आगशी मधील भातशेती आणि नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विषारी कचरा मिसळल्याने शेतकरी समुदाय मोठ्या पर्यावरणीय संकटाच्या काठावर उभा राहिला आहे. दूषित पाण्यामुळे मोइता, पाद्रीभाट आणि माळवाडा या वॉर्डांतील शेतांमध्ये काळसर पसरत असून, यामुळे पिकांचे नुकसान आणि पाणवठ्यांचे जैविक आरोग्य धोक्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व तयारी सुरू केली असताना या प्रदूषणामुळे त्यांना आर्थिक आणि उत्पादनविषयक नुकसान होण्याची भीती आहे. स्थानिक वांगी, ज्याला भौगोलिक निर्देशांक (जीआय टॅग) प्राप्त झाला आहे, हा प्रादेशिक ओळख असलेला पीकप्रकार सुद्धा या संकटाच्या छायेत आहे.

घटनेनंतर, आरोग्य विभाग आणि गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी घटनास्थळी भेट देऊन दूषित पाण्याचे नमुने तपासणीसाठी गोळा केले आहेत. मात्र स्थानिक रहिवाशांनी आणि शेतकऱ्यांनी या दूषिततेचा स्रोत तातडीने शोधण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर माजी सरपंच झेवियर ग्रासियास यांनी त्वरित आणि सखोल तपासाची मागणी केली असून, स्थानिक पंच ज्युलिएटा रिबेरो यांनी शेतकऱ्यांच्या शंका दूर करण्यासाठी प्रशासनाने विश्वासार्ह आणि वेळेवर उत्तरं द्यावीत, अशी मागणी केली आहे.

पर्यावरण कार्यकर्ते रामराव वाघ यांनी दूषित पाण्यामुळे शेतांतील ऑक्सिजनची पातळी घटल्याची शक्यता व्यक्त करत त्या तपासणीची मागणी केली आहे. दरम्यान, सांत आंद्रेचे आमदार वीरेश बोरकर यांनी संबंधित विभागांना या दूषिततेच्या मूळ कारणाचा शोध घेण्यासाठी आणि भविष्यातील धोके टाळण्यासाठी व्यापक तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या संपूर्ण प्रकारामुळे आगशी सारख्या जैविक शेती करणाऱ्या भागात नैसर्गिक साधनसंपत्तीवर निर्माण झालेला धोका अधिकच गडद झाला असून, तात्काळ उपाययोजनांची आवश्यकता निर्माण झाली आहे.

# गोव्यातील बेडकांवर एल निनोचा परिणाम

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ पर्यावरणीय असंतुलनाचे संकेत

▶ पावसाच्या विसंगत वितरणामुळे काही भागांत पुराचा प्रकोप

**पणजी, दि. १५ :** एल निनोमुळे गोव्यातील हवामान चक्र विस्कळीत झाले असून, उच्च तापमानानंतर आलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे राज्यभरात नैसर्गिक संतुलन बिघडल्याचे संकेत मिळत आहेत. याचा सर्वाधिक फटका कृषी क्षेत्रातील परिसंस्थेला बसला असून, शेतांमध्ये टॅडपोल (बेडकांची पिल्ले) मृत्यूमुखी पडण्याच्या घटनांमुळे पर्यावरणतज्ज्ञ आणि वन अधिकाऱ्यांची चिंता वाढली आहे.

बेडूक ही कीटक नियंत्रणात ठेवणारी महत्त्वाची जैविक साखळी असल्यामुळे त्यांच्या संख्येतील घट ही पर्यावरणीय संकटाची नांदी ठरत आहे. हवामानातील अनियमितता आणि पावसाच्या विसंगत वितरणामुळे काही भागांत पुराचा प्रकोप आहे, तर काही भाग अजूनही कोरडेच आहेत.

या पार्श्वभूमीवर, गोवा वन विभागाने यंदा पावसाळ्याच्या पूर्वसंध्येला 'सेव्ह द फ्रॉग' (बेडूक वाचवा) ही जनजागृती मोहीम सुरू केली आहे. बेडकांच्या अधिवासाचे संवर्धन करणे आणि त्यांच्या प्रजातींचे रक्षण करणे, हा या मोहिमेचा उद्देश आहे. याशिवाय, स्थानिक जैवविविधतेला बाधा न आणता देशी प्रजातींचे वृक्षारोपण करण्यावरही भर दिला जात आहे.

पर्यावरण तज्ज्ञ आणि प्राणीमित्र अमृत सिंग यांनी यासंदर्भात चिंता व्यक्त करताना सांगितले की, पावसाळा हा बेडकांचा प्रजनन कालावधी असतो. याच काळात त्यांची संख्या अधिक असल्याने बेकायदेशीर शिकारी त्यांना मोठ्या प्रमाणावर पकडतात. विशेषतः भारतीय बेलफ्रॉगही प्रजाती धोक्यात आहे, असे त्यांनी सांगितले.

सिंग यांच्या मते, शिकारी आता गस्त टाळण्यासाठी पहाटे तीन ते चार वाजता शिकार करत आहेत. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरील काही मोठ्या हॉटेल्सकडून यांना मोठ्या प्रमाणावर मागणी असते, अशी माहिती त्यांनी दिली. त्यांनी असा इशाराही दिला की, बेडकांच्या संख्येत घट झाल्यास डास आणि कीटकांच्या संख्येत वाढ होऊ शकते, ज्यामुळे रोगराई आणि पर्यावरणीय असंतुलन निर्माण होऊ शकते.

गेल्या वर्षी वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या सहा जणांना अटक करण्यात आली होती. यामध्ये बेडकांची बेकायदेशीर शिकार आणि काही सॉफ्टशेल कासवांच्या तस्करीचा समावेश होता. यंदाही अशाच कारवायांची अपेक्षा वन अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. सेव्ह या स्वयंसेवी संस्थेचे प्रमुख चरण देसाई यांनी सांगितले की, ग्रामीण भागात अजूनही बेडकांचे मांस खाण्याची गुप्त प्रथा सुरू आहे. बेलफ्रॉगचा आकार आणि चव यामुळे तो शिकाऱ्यांचे मुख्य लक्ष्य ठरतो, असे त्यांनी नमूद केले. तसेच, अद्याप बेडकांच्या शिकारीविषयी कोणतेही औपचारिक सर्वेक्षण झाले नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

देसाई म्हणाले, 'सेव्ह द फ्रॉग' सारख्या उपक्रमांमुळे सकारात्मक बदल होत आहेत, परंतु स्थानिकांच्या सहभागाशिवाय वनविभागाच्या गस्त प्रभावी ठरत नाहीत. शिकारींविरुद्धची कारवाई ही प्रतिबंधात्मक न राहता फक्त सुधारात्मक राहते. त्यांनी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जागरूकता निर्माण करण्याची गरजही अधोरेखित केली.

गोवा वन विभागाचे वन्यजीव संरक्षक नवीन कुमार यांनी सांगितले की, बेडूक वाचवा मोहीम ही विशेषतः बेलफ्रॉगवर लक्ष केंद्रित करणारी महत्त्वाचे पाऊल आहे. विभाग डिजिटल साधनांचा वापर करून प्रगतीवर लक्ष ठेवत आहे आणि एसएमएस अलर्ट व शालेय पोहोच कार्यक्रमांच्या माध्यमातून घरोघरी संदेश पोचवण्याचे प्रयत्न सुरू आहे.

बेडूक हे परिसंस्थेसाठी अत्यंत आवश्यक आहेत. विशेषतः शेतकऱ्यांसाठी ते उपयुक्त आहेत, कारण टॅडपोल डासांच्या अळ्या खातात आणि रोगप्रसार टाळतात, असे कुमार यांनी स्पष्ट केले. मात्र, त्यांनी कबूल केले की राज्यात अद्याप बेडकांच्या संख्येचा अधिकृत आढावा घेण्यासाठी कोणतेही सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

